**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.**

# जाहिरात

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासनपुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०१७-१८ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सन २०१४-१५ पासून सदर शिष्यवृत्तीचा निधी १००% केंद्रशासनाकडून वितरीत करण्यात येतो.

❖ **शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**

११ वी ते पी. एच्. डी, व्यावसायिक (डी. एड्., बी. एड्., एम.एड्., आय. टी. आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम. सी. व्ही. सी. अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

❖ **किमान पात्रता व अटी :**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा

३) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.

४) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

❖ **अर्जासोबतची आवश्यक कागदपत्रे**

१. विद्यार्थ्याचा फोटो
२. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
३. पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
४. अलपसंख्यांक समुदायाबाबतचे स्वतः प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र.
५. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.
६. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
७. रहिवासी प्रमाणपत्र.( Residential/Domicile certificate)
८. आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सदर कागदपत्रे महाविद्यालयात अर्ज तपासणीसाठी सादर करावी. महाविद्यालयांनी सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी व सदर कागदपत्र त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी. रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबत सर्व कागदपत्रांसह महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह **Upload** करण्यात यावी.

❖ **अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी/नूतनीकरण):**

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

❖ **महाविद्यालय/संस्थेच्या ऑनलाईन नोंदणीसाठी :**

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांची नावे सदर वेबसाईटवर दिसतात त्यांनी नव्याने नोंदणी न करता त्यांचा युजर आय.डी व पासवर्ड प्राप्त करुन घेण्यासाठी या संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या विहित प्रपत्रातील माहिती भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीची स्कॅन कॉपी नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshippms@gmail.com** वर पाठवावी.

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांचे नाव **www.scholarships.gov.in** या वेबसाइटवर दिसून येत नाही त्यांनी आपल्या महाविद्यालय/संस्थेची संपुर्ण माहिती या संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या विहित प्रपत्रात भरुन प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सदर प्रपत्राची तसेच महाविद्यालयाच्या शासन मान्यतेची प्रत स्कॅन करुन नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेल **scholarshippms@gmail.com** वर पाठवावी.

❖ **अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१७-१८ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक. | १ जून ते ३१ ऑगस्ट २०१७ | १ जून ते ३१ जुलै २०१७ |
| २ | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जास महाविद्यालयाने ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | १५ सप्टेंबर २०१७ | |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी जाहिरातीनुसार अंतिम दिनांकाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची तपासणी करून त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या नविन प्राप्त होणा-या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे **www.minorityaffairs.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाशी देखिल जोडलेले (Link) आहे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

(डॉ. धनराज माने )
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.